**NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE**

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

(सायंकाळ)

---

दिनांक १८.०४.२०२६ शनिवार

**१) मा. न्यायालयातुन आरोपीला ०८ वर्ष कारावासाची शिक्षा :—**

दिनांक १८.०४.२०२६ रोजी मा. ३ रे अति. जिल्हा व सत्र न्यायाधीश, नागपुर, श्री. एस. एच. ग्वालानी साहेब यांनी त्यांचे कोर्टाचे केस क्र. ५५६/२०१२ मधील, पोलीस ठाणे हिंगणा येथील अप. क्र. ३०७/२०२३ कलम ३४१,५०६ भादंवि सहकलम ३,२५ भाहका सहकलम १३५ मपोका या गुन्ह्यातील आरोपी सिजोचंद्रन उर्फ प्रिन्स लक्ष्मण रोशलचंद्रन वय ४५ वर्षे रा. १८/२, एमडी रोड, न्यु कॉलनी, देवाली खानपुर, नवी दिल्ली—६२ याचे विरूध्द साक्षी पुराव्याअंती गुन्हा शाबीत झाल्याने, **आरोपीस कलम ३०७ भांदवि अन्वये ०८ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १०,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महिने अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा तसेच, कलम ३४१ भांदवि अन्वये ०१ महिला सश्रम कारावासाची शिक्षा व ५००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०७ दिवस अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा तसेच कलम ५०६ भांदवि अन्वये ०१ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व १,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०१ महिने अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा, कलम ३/२५ भाहका अन्वये ०३ वर्षे सश्रम कारावासाची शिक्षा व ५,०००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०३ महिने अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा तसेच कलम १३५ मपोका अन्वये ०४ महिने सश्रम कारावासाची शिक्षा व ५००/— रू. दंड आणि दंड न भरल्यास ०७ दिवस अतिरीक्त साध्या कारावासाची शिक्षा ठोठावली.**

दिनांक ०१.०८.२०१२ चे ०८.४५ वा चे सुमारास, फिर्यादी श्रीमती रेशमी राजशेखरन पिल्ले वय २९ वर्ष रा. रेल्वे क्वॉर्टर मोतीबाग, पाचपावली, नागपूर हया त्यांचे कंपनीचे स्टॉफबसने बाजारगाव येथे कामावर जात असता, पोलीस ठाणे हिंगणा हद्दीत अमरावती रोड, धामणा, एक्सप्लोझीव्ह कंपनीसमोर आरोपी याने इंडीका कारने येऊन स्टॉफबसला अडवून बसचे आत घुसून फिर्यादीला तु माझे विरुध्द पोलीसात तक्रार का दिली या कारणावरुन त्याचे ताब्यातील अग्निशस्त्र काढून बसमध्ये ०२ गोळया झाडल्या. तसेच फिर्यादीला धमकावून बसमधून खाली उतरवून तिचा जिव घेण्याचे उद्येशाने तिचे डावे पायाचे मांडीवर अग्निशस्त्राने ०१ गोळी झाडून तिला जखमी केले. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे आरोपीविरूध्द गुन्हा नोंदविण्यात आला होता. आरोपीला दिनांक ०३.०८.२०१२ रोजी अटक करण्यात आली होती.

गुन्हयाचे तपासी अधिकारी तत्कालीन पोनि. श्री जी.आर. कंकाळे यांनी मा. कोर्टात तपासाअंती दोषारोपपत्र सादर केले होते. सदर खटल्यात सरकारी अभियोक्ता म्हणून ॲड. श्रीमती कल्पना पांडे मॅडम यांनी तर, आरोपीतर्फे ॲड. श्री वासनिक साहेब यांनी काम पाहिले. सदर गुन्हयात कोर्ट पैरवी अधिकारी पोहवा. दिलीप मंडळ यांनी काम पाहिले.

(कामगिरी)

**<u>गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथक पोलीसांची कामगीरी :— वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस.</u>**

दिनांक १७.०३.२०२६ चे १९.३० वा. ते ०६.०४.२६ चे १५.०० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हुडकेश्वर हद्दीत प्लॉट क्र. ५४, स्वस्तिक कॉलोनी, नागपूर येथे राहणारे फिर्यादी आसिम अब्दुल अली शेख वय २७ वर्षे यांनी त्यांची होन्डा ॲक्टीवा गाडी क्र. एमएच. ३४ सीके ४१८४ किंमती ७०,०००/—रू. ची ही पार्कीगमध्ये लॉक करून, पार्क करून बाहेरगावी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीची नमुद ॲक्टीवा गाडी चोरून नेली. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हुडकेश्वर येथे अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०३(२) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हयाचे समांतर तपासादरम्यान, गुन्हेशाखा वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी तांत्रिक तपास करून मिळालेल्या खात्रीशीर माहीती वरून आरोपी नामे सुसंघ यादव चव्हाण वय ३८ वर्षे रा. जानकी सहनिवास, फ्लॅट क्र. ४७, जयताळा, एमआयडीसी, नागपूर यास ताब्यात घेवुन विचारपुस केली असता, त्याने वर नमुद वाहन चोरीचा गुन्हा केल्याची कबुली दिली. आरोपीचे ताब्यातुन चोरी केलेले दुचाकी वाहन किंमती अंदाजे ७०,०००/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे. आरोपीस मुद्देमालासह पुढील कारवाईकामी हुडकेश्वर पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. वसंत परदेशी अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. राहुल माकणीकर, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. अभिजीत पाटील, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा) यांचे मार्गदर्शनाखाली वाहन चोरी विरोधी पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी केली.

(गुन्हे)

**<u>१) पोलीस ठाणे कळमणा :— गोवंशीय जनावरांना निर्दयतेने व क्रुरपणे कत्तलीकरीता वाहतुक करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १८.०४.२०२६ चे ०३.०० वा. चे सुमारास, कळमणा पोलीसांचे पथक पोलीस ठाणे हद्दीत गस्त करीत असतांना, पावनगाव, शिवाजी पुतळयाजवळ एक बोलेरो पिकअप गाडी क्र. एमपी २० जीबी ४५९८ ही उभी असून काही इसम गाडी चालकासोबत वाद घालतांना दिसल्याने पोलीसांनी पंचासमक्ष गाडीचे चालकास नाव विचारले असता, त्याने त्याचे नाव नितेश राजेंद्र भालेकर वय २१ वर्ष रा. मानेगाव, ता. बरघाट जि. शिवनी, मध्यप्रदेश असे सांगितले. पंचासमक्ष वाहनाची पाहणी केली असता, त्यामध्ये एकूण ०५ जिवंत गोवंशीय जनावरे यांना अवैधरित्या, निदर्यतेने चारा—पाणी न देता बांधुन ठेवल्याचे दिसुन आले. चालकास गोवंशीय जनावरे बाबत कागदपत्रे मागीतली असता, कोणीतीही कागदपत्रे न देता उडवा—उडवीचे उत्तरे दिली. आरोपी हा गोवंशीय जनावरे यांना कत्तलीकरीता नेत असल्याचे निष्पन्न झाले. आरोपींचे ताब्यातुन ०५ गोवंशीय जनावरे व महेंद्रा बोलेरो पिकअप वाहन असा एकुण किंमती अंदाजे ९,३५,०००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद जनावरे यांना गोशाळा येथे दाखल करण्यात आले आहे.

याप्रकरणी फिर्यादी पोउपनि अजय गरजे यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपींविरूध्द कलम ११(१)(ड) प्राणी क्रुरता अधिनियम—१९६०, सहकलम ६६,१९२ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे बेलतरोडी :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक १७.०४.२०२६ चे २३.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे बेलतरोडी हद्दीत पांजरी टोल नाकाजवळील समाधान रेस्टारेंटचे बाजुला, हायवेलगत एका अनोळखी ५५ ते ६० वर्ष वयाचे इसमास कोणीतरी

अज्ञात चारचाकी वाहनाचे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन अनोळखी इसमास धडक देवुन त्याचे जागीच मृत्यूस कारणीभूत होऊन पळुन गेला. मृतकाची ओळख पटलेली नसून त्याने अंगात काळया रंगाचे जॅकेट त्याचे आत करडया रंगाचे लायनिंगचे स्वेटर व मळकट शर्ट, काळया रंगाचा फुलपून्ट घातलेला असून डोक्याचे केस पांढरे, दाढी वाढलेली व पांढरी असे वर्णन असून नमुद इसम परिसरात काही दिवसापासून फिरत असल्याचे टोल नाक्याजवळील कॅन्टीन चालक यांनी सांगितले.

याप्रकरणी फिर्यादी हायवे पेट्रोलींग ऑफीसर श्रीकांत प्रकाशसिंग गिल वय ३९ वर्षे, रा. बर्डे ले आऊट, घोगली यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे बेलतरोडी येथे पोउपनि सलगर ९६७३९९१४०७ यांनी अज्ञात वाहन चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**३) पोलीस ठाणे नवीन कामठी. :— प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.**

दिनांक १८.०४.२०२६ चे ०१.२८ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे नवीन कामठी हद्दीत जबलपूर आऊटर हायवे, लिहीगाव, खांडेकर ढाब्यासमोरुन फिर्यादीचा मुलगा नामे सतिष पुष्पराज कुमेटी वय ३० वर्ष टोयागोंदी, शिरपूर बांध, ता. देवळी, जि. गोंदिया हा त्याचे स्प्लेंडर मोटरसायकल क्र. एमएच ३५ एटी २८७६ ने जात असता, पेट्रोल ट्रक टॅकर क्र. एमएच ४० बीएल ३७०१ चे चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे मुलाचे मोटरसायकलला मागुन धडक देवुन पळुन गेला. जखमी फिर्यादीचे मुलाला उपचाराकरीता उपजिल्हा रूग्णालय, कामठी येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यास तपासुन मृत घोषीत केले.

याप्रकरणी फिर्यादी पुष्पराज पैकू कुमेटी वय ५५ वर्ष रा. टोयागोंदी, शिरपूर बांध, ता. देवळी, जि. गोंदिया यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे नवीन कामठी येथे आरोपी ट्रक चालकाविरूध्द कलम २८१, १०६(१) भा.न्या.सं., सहकलम १३४, १७७, १८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे सक्करदरा :—** दिनांक १७.०४.२०२६ चे ०४.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीत, मोठी ताजबाग, समोसा मैदान पार्कींग येथे एका अनोळखी अंदाजे ४० वर्षे वयाचे इसमाचे दोन्ही पायावरुन ट्रकचे चाक गेल्याने जखमी अवस्थेत त्यास उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे दाखल करण्यात आले होते. उपचारादरम्यान दिनांक १७.०४.२६ चे २०.०० वा. चे सुमारास डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे सक्करदरा येथे पोउपनि. प्रविण वाकडे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६ वे सहदिवाणी | १५८/१९९ | कलम ३२४ | इंद्रपाल चिंतामण नितनवरे रा. | २४.०४.२०२६ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी साहेब, नागपुर. | ६ | भा.दं.वि. | फकीरावाडी, धंतोली, नागपूर | |

**स्वा/–**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपूर शहर.**